**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करते की,**

**नाव** – रेणूका दशरथ खैरे.

**वय** – ६१ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार** – आंबाडे, पो. किटवडे, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.**

**१.** माझे रात्रशाळेचे सहा महिन्यांचे शिक्षण झाले आहे. मी निशाणी अंगठा करते. मला शरद व युवराज अशी दोन मुले आहेत. खमलेट्टी, ता. गडहिंग्लज आमचे मूळ गाव आहे. माझे पती पुर्वी सैन्यात होते. ते सेवानिवृत्त होताना त्यांना आंबाडे गावात शासनाने जमीन दिली आहे. आम्ही आंबाडे गावात २०१० पासून राहत आहोत. मी आरोपींना २०१० पासून ओळखत आहे.

**२.** आमच्या आंबाडे येथील घरासमोर रस्ता आहे. दि.०५.०१.२०२४ रोजी रात्री ०८.३० वाजता आरोपी क्र.१ शिवीगाळी करत होती त्यावेळी मी घरामध्ये होते. मी घरातून बाहेर रस्त्यावरती आले होते. ती आम्हाला त्यांच्या वाटेवरुन जायचे नाही, जनावरे न्यायची नाहीत असे म्हणून शिवीगाळी करत होती. मी आरोपी क्र.१ ला का शिवीगाळी करते याबाबत विचारले असता, तीने लाकडी काठीने माझ्या डाव्या हाताच्या बोटावर आणि डाव्या पायाच्या मांडीवर मारले होते. आरोपी क्र.२ ने मला धक्काबुक्की केली होती.

**३.** त्यानंतर माझ्या पतीने तेथे येऊन आमची भांडणे सोडवायचा प्रयत्न केला होता. त्यावेळी आरोपी क्र.३ व ४ यांनी माझ्या पतीला मारण्याची धमकी दिली होती. तेथून आम्ही घरी आल्यावर पोलिसांकडे तक्रार द्यायला गेलो होतो. पोलिसांनी आम्हाला आज–याच्या सरकारी दवाखान्यात पाठवले होते. तेथे उपचार घेत असताना त्यांनी आम्हाला गडहिंग्लजच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवले होते. तेथे आम्ही उपचार घेऊन आल्यानंतर दि.०६.०१.२०२४ रोजी मी तक्रार दिली होती. तक्रार देण्यासाठी माझ्या सोबत माझे पती व मुलगा शरद आले होते. आता मला मी दिलेली तक्रार दाखवली, त्यावरती माझा निशाणी अंगठा असून त्यातील मजकूर

मला शरदने वाचून दाखवला होता. तो बरोबर असून तिला **नि. क्र. पी.२८** देण्यात येतो.

४. मी तक्रार दिल्यानंतर शिंदे पोलिस व दोन पंच पंचनामा करण्यासाठी आले होते. त्यांनी आमच्या घराजवळील मी व माझ्या पतीने दाखवलेल्या रस्त्याचा पंचनामा केला होता. मी त्यांना घटना घडलेली जागा दाखवली होती. मी त्यांना या व्यतिरिक्त काही दाखवले नव्हते. मी आरोपी क्र.१ ने मला मारहाण केलेली काठी दाखवल्यास ओळखू शकते. आता मला दाखवलेल्या वस्तू क्र.अ वरील काठीने आरोपी क्र.१ ने मला मारहाण केलेली आहे. ती काठी माझ्या पतीने पंचनामा करताना पोलिसांना दाखवली होती. आरोपी आम्हाला तेथून पळवून लावण्यासाठी त्रास देत आहेत. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – श्री. के. जी. पाटील वकील.**

**५.** घटना घडली त्यावेळी आरोपी क्र.१ माझ्या घरासमोरील रस्त्यावर नव्हती. ती घरापासून लांब अंतरावर उभी होती. आरोपी क्र.१ ने मला आमच्या घरासमोरील रस्त्यावरुन शेळया व जनावरे घेऊन जायचे नाही असे सांगितले होते. आमच्या घरासमोरचा रस्ता सरकार जमिनीतून आहे. आरोपी रस्त्याच्या पलीकडच्या बाजूला पाला पेटवत बसले होते. आरोपींनी पाला पेटवलेली जागा सरकारी मालकीची आहे. आरोपी क्र.१ ने शिवीगाळी केली त्यावेळी मी घराबाहेर नव्हते. मी शिवीगाळी ऐकून बाहेर आल्यानंतर आरोपी असलेल्या ठिकाणी गेले होते.

६. घटना घडली त्या ठिकाणी उजेडाची सोय नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने मला लाकडी काठीने डाव्या हातावर व डाव्या पायाच्या मांडीवर मारल्याचे खोटे सांगत आहे. वस्तू क्र.अ ची काठी माझ्या पतीने पोलिसांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.०५.०१.२०२४ रोजी रात्री आम्ही पोलिस ठाण्यात गेलो नव्हतो. आम्ही माझ्या मते त्या दिवशी रात्री १०.०० वाजता पोलिस ठाण्यात गेलो होतो. त्यांनी तक्रार घेण्यापूर्वी आम्हाला दवाखान्यात पाठवले होते. आम्ही सरकारी दवाखान्यातून घराकडे येण्यासाठी रात्री १०.३० वाजता आज–यातून

निघालो होतो. दुस–या दिवशी आम्ही सकाळी १०.०० वाजता पोलिस ठाण्यात गेलो होतो. आज–याच्या दवाखान्यात डॉक्टरांनी माझ्यावर उपचार केले होते. त्यावेळी डॉक्टरांनी माझ्या पतीची तपासणी केली नव्हती.

७. गडहिंग्लजच्या दवाखान्यात माझ्या मांडीचा एक्स–रे काढला होता. मी तो पोलिसांना दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मांडीचा कोणताही एक्स–रे काढलेला नसल्यामुळे मी तो पोलिसांना दिलेला नाही. आम्ही गडहिंग्लजवरुन १०.०० ते ११.०० वाजेच्या दरम्यान परत येऊन आजरा पोलिस ठाण्यात गेलो होतो. दि.०६.०१.२०२४ रोजी सकाळी आम्ही आज–यातून गडहिंग्लजच्या दवाखान्यात गेलो होतो. पोलिसांना तक्रार देताना माझ्या पतीने व मुलगा शरद याने माहिती दिली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी माझी तक्रार घेतली होती. त्यावरती शरदने सांगितल्यामुळे मी निशाणी अंगठा केला होता.

८. आमचा व आरोपींचा शेताच्या हद्दीसह जनावरे एकमेकांच्या शेतात जाण्यामुळे वाद आहे. घटनेवेळी माझ्याकडे शेळया व म्हैशी होत्या. त्यावेळी माझ्या शेळया आरोपींच्या शेतात जात होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आमचा आरोपीं वरती शेताच्या हद्दीसह जनावरे जात असल्यामुळे राग आहे. आरोपींनी पाला पेटवलेली जागा माझ्या घरापासून ७० फूटांवरती आहे. आरोपींनी शेती स्वच्छ करण्यासाठी पालापाचोळा पेटवला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्या शेताशेजारी पालापाचोळा पेटवल्याचे वाटल्यामुळे मी तेथे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी क्र.४ एकटाच तेथे पालापाचोळा पेटवत होता.

९. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीने आरोपी क्र.४ ला पालापाचोळा पेटवण्यापासून अडवल्यानंतर त्यांच्यात वाद होऊ नये यासाठी मी तेथे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी जाताना शेतात पडल्यामुळे माझ्या हाताला व पायाला जखम झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याचा गैरफायदा घेण्यासाठी आरोपीं विरोधात आज खोटी साक्ष देत आहे. मी व माझ्या पतीने पोलिसांना पंचनाम्याचे ठिकाण दाखवले होते. पोलिसांनी पाला जाळलेल्या ठिकाणाचा पंचनामा

केला नव्हता.

**१०**. आरोपी माझ्या दारातील रस्त्यावरुन ये–जा करतात. ते त्या रस्त्याचा कधीपासून वापर करतात याबाबत मला माहिती नाही. आमच्या दारात आमच्या मालकीचा रस्ता नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते, पुर्वीपासून त्यांना सरकारी जागेतून रस्ता आहे. मला त्या रस्त्याने आरोपी कोणत्या कारणावरुन ये– जा करतात याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्या रस्त्याने ये– जा करताना शिवीगाळी करते.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०४.२०२६. **(आर. पी. थोरे)**

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.